**नि.फौ.ख.क्र.१४३/२०२१**
सरकार — वि.- तरुणकुमार मोहन व इतर
**निशाणी क्र. ५६**

**सरकारपक्षा तर्फे साक्षीदार क्र. २ -**
मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की,

माझे नाव — अशोक लालासाहेब पायाळ - जप्ती पंच
वय — ३५ वर्षे, व्यवसाय — मजुरी,
सध्या रा. - ताडीवाला रोड, पुणे.

**सरतपासणी सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्रीमती ए.एस.काळे यांचेमार्फत शपथेवर सुरु-**

दि. २५/०५/२०२१ रोजी गुन्हे अन्वेषण शाखेचे अंतरकर साहेब यांनी मला पंचनाम्याकामी लोणावळा दुरक्षेत्र पोलीस स्टेशन येथे बोलवले होते. मी गेलो तेव्हा त्यांच्या ताब्यात दोन आरोपी होते. त्यांना चेन्नई एक्सप्रेस या ट्रेनमधुन उतरवुन ठेवलेले होते. त्यांच्याकडे एकुण ६ बॅग होत्या ज्यामध्ये ४ ट्रॅव्हलींग बॅग व २ सॅक बॅग होत्या. पोलीसांनी माझे समक्ष त्या बॅग उघडल्या तेव्हा त्याच्यामध्ये इतर जातीचे सरडे, कासव व मासे होते. पोलीसांनी वन विभागाचे अधिकारी तेथे बोलवले होते. त्यानंतर आम्ही सर्वजण वनविभागाच्या अधिका-यांसोबत दोन सरकारी वाहनाने चांदणी चौक, पुणे येथील एका ट्रस्टमध्ये गेलो. त्याठिकाणी डॉ. नेहा मॅडम होत्या. त्यांनी सांगितले की, सरडे इग्वाना आफ्रीकन जातीचे आहेत. सरडे १२०७, कासव २७९ होते व काही मासे १९८ असल्याचे नेहा मॅडमनी सांगितले होते. सदरील सर्व प्राणी पोलीसांनी ट्रस्टच्या हवाली केले. त्यानंतर बॅग जप्त करुन जप्ती पंचनामा तयार करण्यात आला होता. तो पंचनामा दाखवल्यास मी ओळखु शकतो. अभिलेखावर दाखल करण्यात आलेला पंचनामा छायांकीत स्वरुपाचा असल्याने त्यास **आर्टिकल अ** संबोधण्यात येते. आरोपींना पाहिल्यास मी ओळखु शकतो. आज रोजी ते न्यायालयात हजर आहेत.

**सरतपास पुर्ण.**

**आरोपींतर्फे साक्षीदाराचा उलटतपास विधीज्ञ श्री. आर. टी. देशमुख यांच्यामार्फत सुरु-**

२. रेल्वे स्टेशनच्या बाजुला ताडीवाला रोड आहे. लोणावळयाला जायला एक ते दीड तास लागते. मी त्या दिवशी लोणावळयाला फिरायला गेलो होतो. माझेकडे रेल्वेचे तिकीट होते. तिकीट मी पोलीसांना दिले नव्हते. मी रेल्वे पोलीसांना नेमक्या किती प्रकरणांमध्ये पंचनाम्यासाठी

मदत केली आहे ते मला आठवत नाही. मी नेहमी मदत करत असतो. मी त्यांना मागील ७ ते ८ वर्षांपासुन पंचनाम्याकरीता मदत करत आहे. मला आठवत नाही की, मी दोन ते तीन हजार पंचनाम्यासाठी पोलीसांना मदत केली आहे किंवा कसे. आज माझी पंच म्हणुन साक्ष देण्याची दुसरी वेळ आहे. न्यायालयाचे समन्स मी सोबत आणलेले नाही.

३. मला पंचनाम्याकामी बोलवण्यासाठी अंतरकर साहेबांनी फोन केला होता. त्यांनी मला दुपारी ०३.४५ च्या दरम्यान फोन केला होता. त्यांनी विचारल्यानंतर मी त्यांना सांगितले की, मी लोणावळ्यात आहे. त्यांनी मला पंचनाम्यासाठी येण्यास सांगितले होते. हे म्हणणे खरे आहे की, आरोपीच्या ताब्यात ४ ट्रॅव्हल्स बॅगा व २ सॅक बॅग मिळाले असल्याबाबत अंतरकर साहेबांनी मला सांगितले होते. बॅग कधीपासुन पोलीस स्टेशनला होत्या त्याबददल मला माहिती नाही.

४. आम्ही ज्या सरकारी वाहनाने गेलो होतो त्या वाहनांचे नंबर मला आठवत नाही. लोणावळा पोलीस स्टेशनपासुन चांदणी चौकात जाण्याकरीता आम्हाला एक ते दीड तास लागला होता. चांदणी चौकात बिल्डींग कुठे होती व किती मजली होती हे मला आठवत नाही. चांदणी चौक प्रसिध्द आहे. हे म्हणणे खरे नाही की, पोलीसांनी बॅग जप्त करताना सील केल्या होत्या व त्यावर आम्ही सर्वांनी सहया केल्या होत्या असे काही घडले नव्हते. पंचनाम्यावर त्या गोष्टी नमुद नसल्याचे कारण मला सांगता येणार नाही. ६ बॅग जप्त केल्या हे पंचनाम्यावर का लिहले नाही याचे कारण मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे नाही की, सरतपासात सांगितलेला मजकुर मी खोटा सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझे समक्ष कुठलाही पंचनामा झाला नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी पोलीसांसाठी नेहमी पंचनाम्याकरीता जात असल्याने मी खोटया पंचनाम्यावर सहया केल्या.

५. पंचनामा झाल्यानंतर या प्रकरणा संबंधी माझा व पोलीसांचा पुन्हा संपर्क झाला नाही. मी आरोपींना लोणावळा पोलीस स्टेशनमध्ये पाहिले होते. दि. २८/०५/२०२१ रोजी अंतरकर साहेबांनी मला लोहमार्ग पोलीस स्टेशन येथे बोलवले होते किंवा कसे हे आठवत नाही. मला आठवत नाही की, दि. २८/०५/२०२१ रोजी पोलीसांनी मला आरोपींना पुणे लोहमार्ग पोलीस स्टेशन येथे दाखवले होते किंवा कसे.

६. दि. २८/०५/२०२१ बाबत मला काही न आठवण्याचे कारण सांगता येणार नाही. दि. २८/०५/२०२१ रोजीचा अटक पंचनामा साक्षीदारास दाखवण्यात आला. सदरील पंचनाम्यावरील सही माझी आहे. सदरील पंचनाम्यास **नि.क्र. ५७** देण्यात येतो. अंतरकर साहेबांनी मला पुणे लोहमार्ग पोलीस स्टेशन येथे बोलवले असलेबाबत आठवत नाही. पंचनाम्यातील मजकुराबाबत मला काही सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे नाही की, पोलीसांच्या सांगण्यावरुन मी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पुर्ण.**

**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर निवेदन स्विकृत

Digitally signed by CHAVAN NIKHIL JEEVANRAO
Date: 2026.07.02 17:15:54 +0530

दि. ०२/०७/२०२६
स्थळ - पुणे

**(एन.जे.चव्हाण)**
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,
लोहमार्ग न्यायालय, पुणे.